# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

सूचना का अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००३८६

**अपिलार्थी श्री. रुपेश भालचंद्र किर**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (आरोग्य-५)**
सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, बी-विंग, नवीन मंत्रालय, मुंबई -४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव**
सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, बी-विंग, नवीन मंत्रालय, मुंबई -४०० ००१.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०४.२०२४</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०५.२०२१ | ०८.०६.२०२१ | ०६.०९.२०२१ | ०१.११.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १९.०१.२०२२ रोजीच्या अर्जान्वये अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०८.०६.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०१.११.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांचा माहिती अर्ज दि. २१.०५.२०२१ अन्वये कोविड-१९ काळात कोविड सेंटरसाठी राज्य शासनाने स्वत: केलेला खर्च तसेच केंद्र सरकार व इतर संस्था संघटनांकडून मिळालेले सहाय्य असा विषय नमूद करुन सहा मुद्दयांमध्ये माहिती विचारलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. ०८.०६.२०२१ अन्वये अपिलार्थी यांना सदर अर्जान्वये मागविण्यात आलेली माहिती या कार्यासानात संकलीत करण्यात येत नाही. सबब माहिती अधिकार २००५ च्या कलम ६(३) अन्वये माहिती अधिकार अर्ज पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी जन माहिती अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांचेकडे हस्तांतरीत करण्यात येत आहे, असे कळविले आहे.

अपिलार्थी यांनी दि. ०६.०९.२०२१ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.११.२०२१ रोजी अपिलार्थींनी त्यांना आवश्यक असलेली माहिती संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी,असे आदेश पारीत करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, त्यांनी सहा मुद्दयामध्ये माहिती मागितली होती. त्यामधील मुद्दा क्रमांक २, ४ व ५ या मुदयांची माहिती त्यांना अद्यापही मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपिलार्थींचा अर्ज कलम ६(३) अन्वये जन माहिती अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांचेकडे हस्तांतरीत केला आहे. त्यांनी प्रथम अपीलही तिकडे करायला हवे होते. अपिलार्थींना दि. १४ नाव्हेंबर, २०२१ रोजी काही माहिती दिली व काही उपलब्ध नाही, असे कळविले होते. अपिलार्थींनी मागितलेली माहिती व्यापक स्वरुपाची होती. तसेच वेगवेगळया मुद्दयांवर होती. माहिती अनेक सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित आहे त्यामुळे दुसऱ्या मुद्दाची माहिती देता येणे शक्य नाही. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे कार्यालयाकडून अपिलार्थींना मुद्दा क्रमांक ४ व ५ ची माहिती देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी नमूद केले की, माहिती उशिराने मिळाली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अर्जदाराने त्यांचा माहिती अर्ज दिनांक २१.०५.२०२१ मध्ये ०६ मुद्दयावर माहिती विचारली होती. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१ नाव्हेंबर २०२१ रोजी अर्जदारान मागितलेली माहिती १० दिवसात उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश पारीत करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे आहे की, त्यांना विचारलेल्या सहा मुद्दयांपैकी मुद्दा क्रमांक १, ३ आणि ६ ची माहिती काही अंशी मिळाली होती.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे की, मुद्दा क्रमांक २ ची माहिती एका ठिकाणी उपलब्ध नसल्याने अपिलार्थींना उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही. मुद्दा क्रमांक क्र ४ व ५ ची माहिती संचालक आरोग्य सेवा यांनी परस्पर दिनांक १९ एप्रिल, २०२४ रोजी अपिलार्थींना दिली आहे.

अपिलार्थी यांचे म्हणणे आहे की, त्यांना माहिती मिळायला उशीर झाला आणि मुद्दा क्रमांक ६ बद्दल आणखी स्पष्ट तपशील हवा आहे.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१. जन माहिती अधिकारी यांनी आयुक्त, आरोग्य सेवा यांना विचारुन मुद्दा क्रमांक ६ मध्ये जर असे काही करार केले असतील तर त्याबद्दलची माहिती अपिलार्थींना द्यावी किंवा जर असे करार करण्यात आले नसतील तर तसे स्पष्ट उत्तर अपिलार्थी यांना १५ दिवसात द्यावे.**

**२. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
२३-४-२०२४

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission
Greater Mumbai
सत्यमेव जयते

**मुंबई**
**दिनांक : २३.०४.२०२४**